## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्ग

## सहार रोड मेट्रो स्थानकामध्ये सहाव्या भुयारीकरणाचे अनावरण संपन्न

**मुंबई, २० फेब्रुवारी २०१९:** मुंबई मेट्रो ३ मार्गिकेच्या पॅकेज ६ मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोड दरम्यान ६९२ मीटरचे भुयार तब्बल १६० दिवसात पूर्ण करण्यात आलेले आहे. १५० निष्णात अभियंते आणि कामगारांच्या अथक परिश्रमाने हे भुयार यशवीपणे पार करण्यात मुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशनला यश प्राप्त आहे.

तापी १ या टीबीएम मशीन ने दिनांक १३ सप्टेंबर २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते सहार रोडपर्यंतच्या भुयारीकरणाला प्रारंभ केला. ८९ मीटर इतके लांब तापी १ या टराटेक कंपनीच्या टीबीएमद्वारे प्रतिदिन ४. ३१ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरण करते . भुयारीकरणाप्रमाणेच सहार स्थानकाच्या बांधणीचे काम सर्वात महत्त्वाचे आहे कारण मुंबईची सर्वात जुनी आणि तितकीच महत्वाची जलवाहिनी "तानसा"ला न हलवता त्याच्या खालून च्या खालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम करण्यात येत आहे.

ब्रेशिया आणि बेसाल्ट यांसारख्या टणक खडकांना भेदत तापी १ ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्स चा वापर करत भुयार तयार केले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पूर्ण प्रकल्पातील ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीपेक्षा जास्त भुयारीकरण पूर्ण झाले असून एकूण १७ टीबीएम मशीन दहा लाँचिंग शाफ्ट मधून कार्यरत करण्यात आले आहेत.

यावर प्रतिक्रिया देताना मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या , " मुंबई मेट्रो ३ च्या संपूर्ण प्रकल्पात सहार मेट्रो स्थानकाची बांधणी सर्वात महत्त्वपूर्ण आणि तितकीच आव्हानात्मक आहे कारण मुंबईची सर्वात महत्वाची जलवाहिनी 'तानसा' ला संपूर्णपणे सुरक्षित ठेऊन त्याखालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम यशवीपणे पार पाडण्यात आमच्या अभियंत्यांना यश प्राप्त झाले आहे, त्यांचे मनापासून अभिनंदन."